# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## (सामान्य प्रशासन विभाग- कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष)

## शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा "करार पध्दतीने" विवक्षित कामासाठी नियुक्तीबाबत.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील खालील पदे **"करार पध्दतीने" तात्पुरत्या स्वरुपात १ वर्ष कालावधीकरिता नियुक्ती करण्याची आहे.** तरी सदर पदांसाठी इच्छुक उमेदवारांकडुन दिनांक:- १८/११/२०२५ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | पदांचे नाव | पदसंख्या | मानधन (दरमहा) |
|---|---|---|---|
| १ | विशेष कार्यकारी अधिकारी (विद्युत) | ०१ | नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमे एवढी रक्कम इतका मासिक पारिश्रमिक मोबदला |
| २ | मालमत्ता नोंदणी अधिकारी | ०१ | |

**उमेदवारांना सर्वसाधारण सुचना व अटी:-**

- विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक.
- करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
- करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
- उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह अर्ज शैक्षणिक अर्हता, अनुभव, आधार कार्ड ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला इत्यादी कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज **मा. सहाय्यक आयुक्त, सा.प्र.वि.-कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष. सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांचे नावे आपटा पोलीस चौकी जवळ, चौकोनी पाण्याची टाकी, पहिला मजला सांगली,** येथे दि. १८/११/२०२५ रोजीपर्यंत सादर करण्याचा आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
- प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची मुलाखतीनंतर अंतिम निवड करण्यात येईल. याबाबतच्या तारखा अलहिदा कळविण्यात येतील. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा सद्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर न चुकतानमुद करावा.
- निवड झालेल्या उमेदवारांना १ वर्ष कालावधीकरीता नेमणूक देण्यात येणार आहे.
- सदर करार पध्दतीने नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील करार तत्वावर असून या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापनेवरील सेवेशी कोणताही संबंध नाही.
- नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही, अथवा कायदेशीर दाद मागता येणार नाही.
- निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विहीत नमुन्यात स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.
- सदर जाहिरातीच्या नियुक्त्या, पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी, अधिक मजकुर इ. बदल वा प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

- करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
- नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
- करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
- करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
- करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
- करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळावेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.
- करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

मा. आयुक्त तथा प्रशासकसो यांचे मान्यतेने

V.m. Shinde

(विनायक शिंदे)

**सहाय्यक आयुक्त, सा.प्र.वि.-भरती/पदोन्नती कक्ष**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

क्र.मनपा /साप्रवि-भपकक्ष/ २१९/२०२५

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

दिनांक - ११/११/२०२५